# उडण्या हे आभाळ

(स्त्रीजीवनावरील कवितासंग्रह - भाग ३)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**उडण्या हे आभाळ** (स्त्रीजीवनावरील कवितासंग्रह - भाग ३)
**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : drmangushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.
**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : मार्गशीर्ष शु. ३, शके १९४७
रविवार, दि. २३ नोव्हेंबर, २०२५

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-995633-2-2

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/-**

सर्व रसिकवरांना
सादर समर्पण...

# मनोगत

उडण्या हे आभाळ ही कल्पना माझ्या मनात अनेक वर्षांपासून उमलत होती. स्त्रीजीवनाच्या अफाट अनुभवांवर लिहिताना मला नेहमी एक प्रश्न पडायचा. स्त्री खरंच कोठवर जगते? समाज सांगतो त्या चौकटीत, परंपरेच्या बंद काचेत, की स्वतःच्या आभाळात? एक दिवस उत्तर मिळाले. स्त्री कुठेही राहत असली तरी तिच्या मनावर नेहमी एक आकाश असते, आणि त्या आकाशात उडण्याची हाक असते.

या संग्रहातील प्रत्येक कविता मी एका स्त्रीचे स्पंदन ऐकून लिहिली आहे. त्या स्पंदनात कधी उत्साह होता, कधी रोध, कधी असहायता, कधी उत्कट जिद्द, कधी थकवा, आणि कधी पुन्हा नव्याने उमलण्याची आस होती. स्वतःच्या आयुष्यात भेटलेल्या अनेक स्त्रियांनी मला खूप काही दिलं. त्यांच्या नजरा, हशा, डोळ्यातील पाणी, काळजातल्या घुसमटीचे आवाज सगळं. त्या भावनिक नोंदीच माझ्या कवितेत रूपांतर पावल्या.

शब्द लिहिण्यापूर्वी स्त्रीचे जगणे समजून घेण्याचा मी प्रयत्न केला. स्त्री कधीच फक्त एक नातं नसते. तिचं मन अनेक थरांचं, अनेक वर्तुळांचं असतं. ती जन्माला येते तेव्हा तिचा प्रवास सुरू होतो कधी कोमल, कधी कठीण, कधी वेदनादायी, तर कधी अत्यंत सुंदर. तिच्या प्रवासातील प्रत्येक टप्प्यात अनेक अनुभवांचे दगड असतात. काही चुकतात, काही जुळतात, काही वेदना देतात, तर काही अमर आनंद देतात.

स्त्री म्हणजे अंतर्मनाचा अथांग सागर. त्यात माघाऱ्या नाहीत; त्यात फक्त भरतीओहोटी आहे. ती कोसळते, पण पुन्हा उठते. तिच्या ओंजळीतून जे काही निसटतं, ते कधी परत येत नाही, पण त्याच वेळी तिच्या पायातील जखमा तिला चालायला शिकवतात. ती रडते, पण तिच्या हृदयातील पाणीही जगाला जन्म देऊ शकतं. तिच्या डोळ्यातील प्रकाश कितीही मंद झाला तरी तिच्या स्वप्नांत सूर्य

उगवतच राहतो. उडण्या हे आभाळ हा त्या सूर्याचा शोध आहे. या काव्यसंग्रहात मी स्वतःला अनेक वेळा पाहिलं. माझ्या प्रवासातील वाटा, माझे निर्णय, माझ्या चुका, माझे धाडस, माझा साहित्याचा संघर्ष, आणि माझ्या लेखनातील निष्ठा. यात मी इतर स्त्रियांना पाहिलं. ज्या आयुष्यभर शांत राहिल्या, पण मनात आकाश पाळलं. काही स्त्रिया अधीर होत्या. त्यांना स्वतःचे घर हवे होते, स्वतःचे आकाश हवे होते. काही स्त्रिया खूप शांत, त्यांच्या पंखांत दम होता, पण उडण्याची परवानगी कुणीतरी काढून घेतली होती. या कवितांमधून मी त्या सर्व स्त्रियांच्या वतीने उडण्याचा प्रयत्न केला. स्त्रीचे जगणे आमच्या समाजात अजूनही संघर्षमय आहे. तिच्यातले धैर्य कमी नाही, पण तिच्यावर लादलेले दडपण अजूनही जड आहे. पण मला विश्वास आहे. स्त्री जेव्हा शब्दांशी बोलते, पंख ओळखते, स्वतःचे वातावरण निर्माण करते. तेव्हा ती जगातील सर्वात ताकदवान सजीव बनते.

या संग्रहातील माझी एकच इच्छा ही कविता प्रत्येक स्त्रीच्या मनात एक नवीन आकाश उघडो; आणि प्रत्येक पुरुषाच्या मनात स्त्रीचे जगणे समजून घेण्याची संवेदना निर्माण करो. उडण्या हे आभाळ माझ्या सर्व स्त्रीवाचकांसाठी माझी प्रणामांजलि आणि पुरुषवाचकांसाठी स्त्रीला 'समजून घेण्याची' एक हळवी दिशा.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

'उडण्या हे आभाळ' या नावातच स्त्रीजीवनाचा अमर गीतस्वर आहे. 'उडणे' म्हणजे मुक्ती, स्वप्न, आकांक्षा, आणि 'आभाळ' म्हणजे त्या सर्वांचा अनंत विस्तार. स्त्रीत्वाच्या प्रवासात जिवाभावाने स्पंदणाऱ्या प्रत्येक जिवनकवितेतील एक दडलेला अर्थ असतो आणि तो अर्थ म्हणजे स्वतःच्या पंखांना ओळखणे. या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता त्या पंखांना ओळखण्याचा आणि त्यांना नवी दिशा देण्याचा एक सृजनमय प्रयत्न आहे.

स्त्रीजीवन म्हणजे फक्त भूमिका नाहीत. आई, मुलगी, बहीण, सून, पत्नी ही नावे तर समाजाने दिलेली मुखवटे आहेत. पण या मुखवट्यांच्या मागे एक अखंड विश्व आहे. तिची स्वप्ने, तिचा संघर्ष, तिची पाखरं, तिची उगवती किरणे, तिची पडझड, तिच्या ओल्या-कोरड्या स्मृती, तिचे मूक क्रंदन आणि तिचा निर्भय उड्डाणाचा निश्चय. उडण्या हे आभाळ हा काव्यसंग्रह त्या स्त्रीविश्वाच्या असंख्य छटांमधील अनोख्या, कोमल, प्रखर, सशक्त प्रतिमांचे जिवंत रेखाटन करतो.

या कवितांमध्ये स्त्रीचा आवाज कधी मंद वाऱ्याची झुळूक आहे. एखाद्या पहाटेच्या क्षणाची हलकी चाहूल देणारी. कधी तो धगधगता ज्वालामुखी आहे. रुढींच्या आणि बंधनांच्या अंधाराला भेदून स्वतःचे अस्तित्व जाहीर करणारा. आणि कधी तो शांत, थकलेला, ओढ लावणारा धूर आहे. जीवनातील अपरिहार्य वेदनांचे स्मरण देणारा. त्यामुळे हा संग्रह वाचताना स्त्रीजीवनाच्या एका शेवटापासून दुसऱ्या टोकापर्यंतचा अवकाश उलगडताना दिसतो. एक संपूर्ण आकाश तिच्यासाठीच रेखाटलेले.

स्त्रीची यात्रा हा संघर्षाचा, पण तितकाच सौंदर्याचा प्रवास आहे. तिच्या जीवनात उभ्या राहणाऱ्या अडचणी केवळ दगड नसतात. कधीकधी ते पायऱ्या बनतात. दुःख हे कडू नसते. कधी कधी ते तिला नव्या बळाची बीजंही देतं.

तिच्या संभ्रमांतूनच तिच्या धैर्याच्या रेषा पक्क्या होतात. तिचे पराभव म्हणजे निष्कर्ष नसतात. तिथूनच तिचे नवे सुरुवातीचे सूर उगवतात. या काव्यसंग्रहातील स्त्री कधी दिशाहीन नाही. ती कधी थकते, कधी थांबते, पण तिला उडायचेच असते. कारण तिच्या रक्तातच आकाशाचे हाक येतात.

या कविता वाचताना जाणवते की स्त्री ही फक्त समाजाच्या अपेक्षांनी बनवलेले रूप नाही. ती स्वतःची शिल्पकार आहे. ती मोडते, घडवते, पुन्हा मोडते, पुन्हा घडवते. तिची ही आत्मनिर्मितीच तिचे खरे अपूर्व सौंदर्य आहे. या संग्रहात तिचे बोलणे इतरांसाठी नसते. ते तिच्यासाठीच असते. तिची कविता तिचा स्वतःचा आरसा आहे. तिच्या मनात असलेले आकाश ती त्या आरशात पाहते.

बहुतेक स्त्रिया स्वतःच्याच कहाण्या लिहितात, पण त्या कहाण्या कधी मोठ्याने बोलल्या जात नाहीत. हा काव्यसंग्रह त्या अनुकूलनाला नकार देतो. येथे स्त्री आपली कथा स्वतःच सांगते. अपेक्षांच्या शिट्यांपेक्षा तिच्या पावलांचे आवाज जास्त दणदणीत आहेत. तिच्या भावना केवळ सौम्य किंवा कोवळ्या नाहीत. त्या प्रचंड, वृक्षाच्या मुळांसारख्या भक्कम आहेत. तिच्या इच्छाही फक्त घरकाम किंवा एकाकी श्वासांवर आधारित नाहीत; ती विश्वाच्या परीघाइतकी विस्तारलेली आहे. त्यामुळे हा संग्रह वाचतानाच जाणवते. स्त्री स्वतःला शोधते तेव्हा ती आकाशाला विस्तार देते.

या कवितांमध्ये आईचा स्पर्श आहे. ज्यामध्ये रक्षण, करुणा, वेदना आणि अपरिमित प्रेमाचा सुवास आहे. यात मुलीची लाजरी कळी आहे. स्वप्नात वाढणारी. यात प्रेयसीचे उष्ण आवेग आहेत. ज्यांत हृदयाची धडधड भिजते. यात पत्नीचे दैनंदिन जगणं आहे. कधी जळणारे चूलराख, तर कधी सुगंधी उदबत्ती. यात कार्यरत स्त्रीचा पराक्रम आहे. जिथे ती स्वतःलाच परत ओळखते. आणि हे सगळे शेवटी तिच्या एका सत्याकडे नेतात. ती आकाशाची मुलगी आहे, तिला उडणं तिच्या जन्मसिद्ध अधिकाराप्रमाणे लाभलेलं आहे.

जीवनात काहीजण स्त्रीच्या पंखांना आवर घालतात. परंपरा, आवाज, अपेक्षा, नियम, समाज, भीती. पण ती ज्या दिवशी स्वतःची आकाशरेषा ओळखते, त्या दिवशी ती पंख उघडते आणि म्हणते 'माझ्या उडण्याला दिशा लागली आहे.' या कवितांमध्ये त्या क्षणांचा उत्सव आहे. स्त्रीने स्वतःला

ओळखण्याचा, पुनःपुन्हा उभे राहण्याचा, आणि शेवटी स्वतःचे आकाश स्वतःच्या ओंजळीत पकडण्याचा हा काव्यप्रवास आहे.

शब्द, प्रतिमा, आणि भाव यांच्या आशयातून या संग्रहात स्त्रीचे आकाश काळोखातून प्रकाशाकडे झेपावते. दुःख तिला तोडत नाही. ती त्यातून बहरते. आनंद तिला अलवार पकडतो. ती त्यात वितळते. स्वप्ने तिला हाक देतात. ती त्याकडे धावते. आणि जेव्हा पंख थकतात, तेव्हा ती पुन्हा स्वतःलाच नवा वारा देते. हा काव्यसंग्रह प्रत्येक स्त्रीला तिच्या अवघड जगण्याला कवितेतून प्रमाण देतो. आणि पुरुषालाही. स्त्रीला खरेपणाने समजून घ्यायला एक भावनिक आरसा देतो.

**श्री. गुरुनाथ पंडित**
विश्वस्त
चिकित्सक समूहाचे
पाटकर वर्दे महाविद्यालय गोरेगाव, मुंबई.

# अनुक्रमणिका


१) येते जीवनी जेंव्हा कोणी ... १३
२) मेंदीमधल्या गंधामधले ... १४
३) कंदील हाती शोधत होते ... १५
४) पापण्यांच्या उंबऱ्याशी ... १६
५) नकोच हुंडा नको मागण्या ... १७
६) गाव राजसाचे दूर ... १८
७) स्त्री ही अतुल्य आहे ... १९
८) एक अनामिक भीती ... २०
९) चुडा जपला मनी मी ... २१
१०) रोज नव्याने जन्मा यावे ... २२
११) एकदा येऊन जा ... २३
१२) या अबोलीसारखी मी ... २४
१३) संगत असता मोहिनी ऋतूची ... २५
१४) प्राजक्त बकुळी अबोलीच व्हावी ... २६
१५) म्हायेरातला प्राजक्त ... २७
१६) जीव तगवुनी जा ... २८
१७) माहेर जिवंत अंतःकरणी ... २९
१८) डोळ्यात आसवे का ... ३०
१९) नखशिखांत साजामध्ये ... ३१
२०) प्रिया वधू मी सख्या तुझी रे ... ३२
२१) बावळ्या कथुल्या खुळ्या ... ३३
२२) पैंजणांचा नाद माझ्या ... ३४
२३) तुझी प्रिय राणी हिरमुसली ... ३५
२४) हात तुझा रे धरून जाईल ... ३६
२५) रेखा नव्या उमटल्या ... ३७
२६) प्रीतशिल्पाच्या लेण्या ... ३८
२७) तिची रेखा दे रे देवा ... ३९
२८) हे स्त्रिये तू आदिमाये ... ४०
२९) हुरहूर लागे जीवा... ... ४१
३०) नाते भासे अनोळखी ... ४२
३१) सुमन जुई ... ४३
३२) वेदनेचे आभाळ ... ४४
३३) मन उगाच होतं हळवं ... ४५
३४) माझे सुखाचे चांदणे होशील ... ४६
३५) आज मला कळते ... ४७
३६) आई वेडी एक बेडी ... ४८
३७) चिमण्या स्वप्नातून रमे आई ... ४९
३८) जन्म सारा तुझ्यासाठी ... ५०
३९) भावनांचा गलबला ... ५१
४०) भेटकलिका सानूल्या ... ५२
४१) आता कुणास सांगू ... ५३
४२) दिसते नवेच स्वप्न ... ५४
४३) चुकते जगायचे अन ... ५५
४४) लिहून भाळी दिले जे आहे ... ५६
४५) अन्य काय मज सांग हवे ... ५७
४६) मनात माझ्या स्वप्नपालखी ... ५८

४७) पोकळी नात्यात होते ... ५९
४८) भाग्यरेखा जोडताती ... ६०
४९) सांगणे सोपे खरे पण ... ६१
५०) जन्म मिळो
मज फुलाफुलांचा ... ६२
५१) पारदर्शीपण
कसे लाभायचे ... ६३
५२) उमेद उरातुन असताना ... ६४
५३) राम नामाचे
घुंगरू बांधायचे ... ६५
५४) इथे फिरस्ती कितीतरी ... ६६
५५) जीवन आनंद दुनावे ... ६७
५६) नाहलेली जलपरी ... ६८
५७) स्त्री असे ऐसी सुजन्मा ... ६९
५८) श्रीहरी रे श्रीहरी ... ७०
५९) आषाढातील पाऊसधारा ... ७१
६०) माझा चांदवा तू सदा ... ७२
६१) सुख स्वर्गीय हे
इथेच आहे ... ७३
६२) असो मोकळे
श्वास आकाश तारे ... ७४
६३) श्वास भरू दे रे मला ... ७५
६४) मदनसुंदरा रहा तू संगी ... ७६
६५) माझ्या मनाच्या कुपीत ... ७७
६६) मागे उर्मिला ठेवली ... ७८
६७) कुणी जरासे हळवे व्हावे ... ७९
६८) तू आला की
माझी दिवाळी ... ८०
६९) हुंदके आले तरी ... ८१
७०) कळले कधीच ना ... ८२



## (१)
## येते जीवनी जेंव्हा कोणी

असेल किंमत मित्राची तर
हात मैत्रीचा धरशील
कष्ट साहण्याची जर हिंमत
प्रीत प्रियवरा करशील

वचन निभावणे जमेल जर तुज
तरंच शपथा देशील
असेल माझे महत्त्व तुजला
तरंच संगती येशील

आठवशील मज मनात असतील
खऱ्या तुझ्या भावना
खोल रुजवशील माझ्यावरची
प्रीत प्रिया सांग ना

वाट पाहणे किती रे अवघड
कळेल का तुज कधी
क्षणा क्षणाची किंमत करणे
जमेल का तुज आधी

तरंच उरेल अर्थ आपुल्या
नात्याला मग खरा
वाट प्रीतीची जितुकी सुंदर
मार्ग कठीण हा जरा

येते जीवनी जेंव्हा कोणी
सांभाळून ठेवणे
देव जुळवितो अगणित नाती
कुणा कसे ते कळणे

दि.२८/०१/२०२३
सकाळी ०७.१७ वा.



## (२)
## मेंदीमधल्या गंधामधले

किती दिवसांनी मेंदी भरले
हात निरखते आहे
पुन्हा नव्याने त्या दिवसांची
ओढ रेखते आहे

त्या प्रेमाच्या हळव्या हळव्या
आजही स्मरती वेळा
ती वचने त्या शपथा साऱ्या
मनात होती गोळा

नव्या नवेल्या प्रीतीमधल्या
आतुर लाघववेळा
भेटीसाठी रोजचा दिवस
होता आसुसलेला

साथ आपुली जन्माची मग
ठरवून गेली नाती
पुन्हा एकदा हसली नाजूक
मेंदी हातावरती

आज आठवले पुन्हा ते सगळे
सगळे झाले ताजे
मेंदीमधल्या गंधामधले
दरवळ तुझे नि माझे

दि.२९/०१/२०२३
रात्री १०.५३ वा.



## (३)
## कंदील हाती शोधत होते

आठवणींनी शिवता मनाला
धडधड वाढून गेली
घरात सखया काल तुझ्या
नावाची चर्चा झाली

किती वेळ मग घर माझे रे
दरवळून गेलेले
प्रीतफुलांच्या गंधासाठी
मन वळून गेलेले

सजले होते स्वप्नी मग मी
नव्या नवरी सारखी
कंदील हाती शोधत होते
तुला प्रिया सारखी

विवाहमंडप दिसला सजला
माळा फुलांच्या डोलत
मेंदीमधल्या रेषा रेखा
साथ देण्यास बोलत

नथनी बिंदी कंगण कुंडल
काजळ खुलले होते
मीच प्रियवरा रूपावर मग
माझ्या भुलले होते

कधी एकदा दिसशील तू मज
म्हणून तळमळ चाले
उभा शयनमंदिरी चंदेरी
चांद नभातून चाले

तू दिसला मज वाट पाहता
माझ्या येण्यासाठी
स्वप्न पूर्ण मग झाले राजा
ओढ भेटण्यासाठी

दि.३०/०१/२०२३
सकाळी ०९.२३ वा.



## (४)
## पापण्यांच्या उंबऱ्याशी

पापण्यांच्या आत माझा
गाव आहे
भावनांची एक नदी
तेथ वाहताहे

बांध मी घालून कितीदा
वाट अडवू
आसवांचा जोर कैसा
सांग अडवू

आत होते काय मजला
ना कळे अन्?
आसवांना वाट तितक्यात
आकळे अन्?

कोठुनी येते कसे ते
वाहते मग
लोचनांनी मन रडके
पाहते मग

का अनावर कोणत्या
त्या भावना
का तुला छळतात
वेड्या मन्मना

पापण्यांच्या उंबऱ्याशी
झडप बंद
केली तरी जळ वाहते
मग ओले अंग

दि.०३/०२/२०२४
रात्री ०८.०३ वा.



**(५)**

## नकोच हुंडा नको मागण्या

हात देखणे मेंदीभरले
अजून काय ते हवे
नकोच हुंडा नको मागण्या
नको फंडे नवे नवे

जीव एक जो जीवास देतो
जीव म्हणून येतो ना
घरादाराला नात्या  साऱ्या
सोडूनही येतो ना

समर्पणाला तन मन असता
धन कशाला व्यर्थ
तीच लक्ष्मी येते घरला
पाऊल तिचे हे सार्थ

घरास देते माया जिव्हाळा
लळा लावते थोर
आयुष्याला झिजवत राहते
घर वात्सल्यविभोर

केवळ द्यावी कन्यका तुम्ही
नकोच आणखी काही
वाढेल माझे भाग्य आणिक
आस कोणती नाही

दि.०५/०२/२०२४
रात्री १०.३२ वा.



## (६)
## गाव राजसाचे दूर

जीवा जाळे हुरहूर
तिन्ही सांजेला का पूर
गाव चांदव्याचे आणि
राजसाचे दूर दूर

वरवर वाटते ना
किती शीतल चांदणे
कसे जाळते मनाला
नये शब्दात सांगणे

दिस सारा सरकतो
सांज काहूर मांडते
काही प्रहरात युगे
सांज टांगणी टांगते

आकाशात चालताना
घाव बेमालूम देतो
नसे साजूक चांद हा
प्राण हलकेच घेतो

वर रातची विराणी
न संपते कधीच
जीव कासावीस होतो
आठवांनी रे आधीच

कळते ना घालमेल
काळजात जी चालते
आजकाल मी चांदणे
राजा प्यायचे टाळते

दि.२९/०२/२०२४
रात्री ०८.०९ वा.



## (७)
## स्त्री ही अतुल्य आहे

आजचा दिवस माझा ऐसे
किती बोलले सारे
रोजचा दिवस मला सारखा
तेच आकाश तारे

देत शुभेच्छा जग म्हणाले
स्त्री ही अतुल्य आहे
तिचा त्याग विश्वास ध्यास हा
सदैव अमूल्य आहे

कुणी म्हणाले नका करू हो
आज तुम्ही ती कामे
आजचा दिवस विशेष आहे
सकल स्त्रियांच्य नामें

बरे वाटले क्षणभर इतका
पाहून आदर सारा
वाहत आल्या स्नेहभराच्या
जिकडून तिकडून धारा

एक मोकळा श्वास घेतला
हवा बोलली काही
मीही आहे स्त्रीच प्रिये ग
आपुली सुटका नाही

कितीही असे दिवस असू दे
जन्म चंदनी होतो
प्राजक्ताचा सडा अबोली
रोज अंगणी होतो

दि.०८/०३/२०२४
रात्री ११.५३ वा.



## (८)
## एक अनामिक भीती

एक अनामिक भीती उगाचच
मनातून का वाटते
उजेडातही अंधाराचे
जाळे उगा का दाटते

उरात दडपण वाढत जाते
उत्तर नाही प्रश्न सारखे
नकळत सारे घडताना मग
जे जे माझे मला पारखे

कुठून एवढी घेरत रहाते
चिंता मनाला पोखरते
कितीही टाळणे म्हटले तरीही
खोल उदासी सदाच ठरते

धूसर पुसटसे चित्र वाटते
रंग फिके ते अनोळखीचे
अनाम वाटा अनाम नभही
अनाम साथी कधी ओळखीचे

अर्थ न कळती भावही परके
जग कोरडे नयन कोरडे
निर्जन जागी टाहो फोडुनी
जणु हृदय मज आर्त ओरडे

दि.२८/०३/२०२४
सकाळी ०८.५६ वा.



## (९)

## **चुडा जपला मनी मी**

सखे साथी चुडा माझा
लग्नापासून जाहला
हिरव्या रंगाचं गुपित
अंगी लेऊन राहिला

किणकिण मधुराची
संगे सखे ती असते
स्वप्नफुलांना हळव्या
घेऊनिया की हसते

नववधूच्या भावना
कानी प्रीतीच्या सांग ना
राजसाच्या खेळविती
अंगा अंगावर खुणा

मेंदीभरल्या क्षणांना
चुडा सजवीत जातो
एक नाद वेडावला
कसा जडवीत जातो

सप्तपदी चालताना
हात हातात घेताना
चुडा पाहतो साक्षीने
सजनाची मी होताना

लाजाहोम लाजलेला
चुडा गाली हसलेला
भेट पहिली वहिली
प्रतीक्षेत बसलेला

चुडा जपला मनी मी
कपाटातल्या खणी मी
जीवनाची सुरुवात
तीच नवी मी जुनी मी

चुडा आजही सांगतो
स्पर्श रेशमी सुखाचे
रुळताना मनगटी
झंकारणे स्पंदनाचे

दि.०६/०४/२०२४
रात्री ०९.५३ वा.



## (१०)
## रोज नव्याने जन्मा यावे

मुक्त श्वास हे भरले मी जे
तसेच कायम भरून घे
जगण्यासाठी काय दुजे पण
स्वच्छ प्राण हा करून घे

दडपण कसले किती दबाव हे
उगाच माणूस पिचतो ना
जे जे आहे मुख्य ते तरी
सारे विसरून खचतो ना

रोज सकाळी आशाकिरणे
सोबत घेऊन उगवावे
रोज पहाटे नवेच जगणे
मानून गाणे तगवावे

ताज्या ताज्या सृष्टीमधले
विचार का हो शिळे तरी
वळतच नाही आम्हा वागणे
तत्त्वाने जरी कळे तरी

सोडून द्यावे जरा मोकळे
काया माया साऱ्यांना
येऊ दे खुल्या गंध वाहत्या
अवखळ शीतल वाऱ्यांना

मुखी हास्याचे कमळ उमलता
डोळ्यामध्ये चमक उठे
जाईल विरून ही घोर निराशा
नव्हती नाही नसेन कुठे

रोज नव्याने जन्मा यावे
नवीच नाती निभवावी
पेरून द्यावे बीज नव्याने
नवीच सृष्टी उगवावी

दि.१३/०४/२०२४
सकाळी ०७.३८ वा.



## (११)
## एकदा येऊन जा

एकदा येऊन जा रे
पाहण्या मन एकटे
का उगा वाटे उदासी
ही भकासी भेटते
एकदा येऊन जा

केस माझे गुंतलेले
झाले वेडे मोकळे
ते तरी निर्जीव वाटती
ओके बोके ओकळे

ही नजर माझी कुणाला
पाहते ना सांगते
शून्य तेथे शून्य येथे
का जीवाला टांगते

अंगठी बोटात राहे
मूक जैसी भावना
तीही आता आस सोडून
भांडते माझ्या मना

या जळाच्या उठती उर्मी
प्रश्न अगणित थांबले
का दिशा झाल्या निरुत्तर
वागणे का हे चांगले

सांगते मी ऐक जमले
तर तुला रे एकदा
वेड माझे ओळखून घे
भेटुनी जा एकदा

दि.२६/०४/२०२४
सकाळी ०७.१४ वा.



## (१२)
## या अबोलीसारखी मी

या अबोलीसारखी मी
आज झाले मूक की
बोलण्याची केवढी
होती कधी मज भूक ती

ऐकणारा कोणी माझा
नाही समजून घेतले
आत ओले मनही माझे
वणव्यासम का पेटले

शब्द माझी भूषणे
कोमल सुरांनी दाटली
त्याचवेळी मग दग्यांनी
मन भुई मज फाटली

नजरेतुन ओसंडलेले
द्वेष किती मी साहिले
काळजाच्या माणसांना
पलटता मी पाहिले

जाहले होते जुई मी
जाई प्राजक्ता कळी
आज आहे बघ अबोली
मुसमुसून रडे एकली

दि.२८/०४/२०२४
सकाळी ०७.५३ वा.



## (१३)
## संगत असता मोहिनी ऋतूची

मजसी खुणावे वाट हरितसी
सळसळ चैतन्याची
उडून जाती क्षणात दुःखे
सुखे मिळती जणू पुण्याची

पर्वतरांगा धुक्यात लपल्या
आकाशाचे धुरात घर
झडांवरती कोंब कोवळे
नवी जीवने फुलली वर

हिरवळ खाली हासून गाली
खळी पाचूची खुलवीत
सांजसकाळी निसर्गराणी
मोहविते मज भुलवीत

उतरून येती स्वर्गातून मग
आकांक्षा देवत्वाच्या
सतत वाटते शीश झुकावे
पुढती सुंदर दिव्यत्वाच्या

वाट कुठे जाते ही दूरवर
आत आत मजसी नेते
क्षणात माझे एकटेपण हे
संपून कैसे हो जाते

म्हणून रमते मीही हिच्याशी
सांगत मनीच्या गुजगोष्टी
संगत असता मोहिनी ऋतूची
नाही दिसत मी कधी कष्टी

दि.२९/०५/२०२४
सायं. ०६.१२ वा.



## (१४)
## प्राजक्त बकुळी अबोलीच व्हावी

असे कोणते गाव माझे म्हणावे
इथे सारे क्षणभर जगाया मिळावे
जरी वाटे सारे हे माझेच आहे
मला ही हळुच ते सहज आकळावे

तरीही पुन्हा मी इथे ओघळावी
प्राजक्त बकुळी अबोलीच व्हावी
जे मूळ सारे मी सोडून देता
सुरभी नवी देत नवेलीच व्हावी

इथे सृष्टी सारी नव्यानेच खुलते
कळी कोंब पाने ही वेलीही डुलते
मग मी अशी का उदासी पहावी
माझ्यावरी मी नव्यानेच भुलते

सकाळी नवी एक आशा पहावी
पुन्हा सांजेला केशराने नहावी
क्षणाला क्षणाची स्मृती देखणी ही
जन्मांतरी ही गहनशी रहावी

इथे आत माझ्या कुणी राहते का
मनाने मनाला हळूच वाहते का
तलम भावना त्या जपुनी कोंदणात
पुन्हा मीच वेडी नवी जन्मते का

दि.१८/०६/२०२४
सकाळी ०६.५७ वा.



## (१५)
## म्हायेरातला प्राजक्त

म्हायेराच्या अंगणात
पारिजातकाचा सडा
गंध भरला आठवे
ओल्या मायेचा तो घडा

व्हता पहाट उजळं
एक किरण सुगंधी
प्राजक्ताच्या परिमळी
मना आजही ती धुंदी

सारं गाव वेचायचं
म्हायेरातला प्राजक्त
आता घर ते उठलं
आठवणीत प्राजक्त

एकटी म्या बसते ना
गाली हसत राहतो
डोकावून मधी मधी
मला हळूच पाहतो

त्याच्या आठवात क्षण
ओघळून रोज जाती
आत काळीज भरतं
आसवांची फुलं होती

दि.२०/०६/२०२४
सकाळी ०६.५८ वा.



## (१६)
## जीव तगवुनी जा

तिन्ही सांजेला येते आठवण
दूर प्रिया राहिला
त्याच्यावरती कधीच मी हा
जीव वेडा वाहिला

पाहते तरी दिसते वेगळे
चित्र दोघातले
सखोल गहन हे तरंग उठती
स्मृती डोहातले

नजर कुठे ती शून्यामध्ये
विश्व आठवांचे
जग दोघांचे असे वेगळे
क्षण किती साठवांचे

दिवस कसातरी ढकलून देता
रात भेडसावते
सांज दोन्हीच्या मध्ये अडसर
मजसी खडसावते

दीर्घ प्रतीक्षा किती त्रासाची
उंबऱ्यात राहणे
येईल राजस अवचित म्हणुनी
किती वाट पाहणे

ये ना आता नको सतावू
जीव तगवुनी जा
एक भेटीची पुन्हा नवी ही
आशा जगवुनी जा

दि.०२/०७/२०२४
सकाळी ०९.३५ वा.



## (१७)
## माहेर जिवंत अंतःकरणी

ओढ ओढते काळजास रोज
तुटते कधी ना नाते
दूर किती लाभे सासर छाया
माहेर दिलासा वाटे

जाणे न होई नेहमी बाई
तरी जवळी मनात आई
तिची ती माया वात्सल्य काया
प्रेमळ आठवे गोड अंगाई

जपते माहेरा खोल खोल किती
दडलेल्या बालपणीच्या स्मृती
क्षणाक्षणाला ताज्यातवाण्या
तराळती साऱ्या घराच्या कृती

बाबांचा आधार जीवा वाटे फार
राबणे दिनराती प्रहरी
झेलत संकटांना अलगद जपताना
मुखी नाम त्यांच्या सदा श्रीहरी

भावंडं लाडकी खेळती अंगणी
सणावारांची उत्साही पर्वणी
जीवात जीव असेल तोवरी
माहेर जिवंत अंतःकरणी

दि.३१/०८/२०२४
सकाळी ०७.५७ वा.



## (१८)
## डोळ्यात आसवे का

डोळ्यात आसवे का
ऐसे पुसू नको रे
खपल्या पुन्हा व्रणांच्या
काढू पुन्हा नको रे

गहिऱ्या खुपून बसल्या
ज्या वेदना तळाशी
वडवा जसा लपावा
वर शांतशा जळाशी

दुखणी किती जपावी
की हानी आठवावी
कित्येक भावनांची
गठडी का साठवावी

नसते कधीच उत्तर
भेसूर प्रश्न छळती
नियतीचे फासे कैसे
कोणास कधी कळती

दाबून ठेवलेल्या
अश्रूंस वाट देते
माझेच दुःख फिरुनी
भेटावयास येते

दि.०१/१०/२०२४
रात्री ०८.१० वा.



## (१९)
## नखशिखांत साजामध्ये

बघ नटले मी सजले आहे
प्रिया तुझ्यासाठी
वाट पाहणे जीवघेणे बघ
ठरेल माझ्यासाठी

शृंगारातून उजळून गेले
लावण्य हे माझे
आभूषणे अन साज हे सारे
अंगावर साजे

पातळ सजवून देते काया
अंबाड्यातून गजरा
तुझ्या स्वागता उभी इथे मी
मुखडा माझा हसरा


हिरव्या चुड्याची किणकिण गोडी
खेचत तुजला आणील
पायातील मज पैंजण घुंगरू
प्रीत तुझी बघ जाणील

नथ मुरडते नाकी माझ्या
कुंकूम भाळी खुलते
कानी झुबे अन कर्णवेल ही
मन सजनाचे भुलते

हळूच येशील चाहूल देशील
मिठीत मिटवून घेशील
क्षणात राजा मला वेगळ्या
जगात आपुल्या नेशील

मग तू राजस पघळून जाशील
विलीन माझ्यामध्ये
खुणा प्रीतीच्या सोड मुलायम
नखशिखांत साजामध्ये

दि.०७/११/२०२४
रात्री १०.५० वा.



## (२०)
## प्रिया वधू मी सख्या तुझी रे

प्रिया वधू मी सख्या तुझी रे
नटले सजले आहे
दर्पणी पाहते रूप निखरले
लज्जेत मी भिजले आहे

तुला पाहते गाली हसते
मनात लाडिक आस
आता तुझ्या नावाने येतील
जातील माझे श्वास

शालू खुलला मेंदी रंगली
गजरा फुलला आहे
साजन माझा प्रीत बावरा
मजवर भुलला आहे

नजरेमध्ये किती स्वप्नांची
माळ ओवली आहे
वाट प्रिया तू दे ना फुलांची
सजनी कोवळी आहे

तुझ्यासवे मी सुख भरलेले
चित्र पाहते आहे
गुंग सदा मी दंग प्रिया रे
तव रंगी राहते आहे

दि.१५/१२/२०२४
रात्री ११.२३ वा.



## (२१)
## बावळ्या कथुल्या खुळ्या

साद मनाची ऐक तू
ऐक राजा भाव रे
बघ दिसे तुजला तुझ्यातच
कोरले मज नाव रे

प्रेम काही आगळे हे
आत्मरूपाची प्रचीती
तू जरा डोकाव आतच
माझी तुज मिळणार रीती

जोडलेले बंध कसले
जुळती ते तर ईश्वरी
हो कृपा त्याची रे जेंव्हा
साथ लाभे वल्लरी

भावनांचे सूर जुळता
गीत उमटून ये असे
साथ देते बासुरी अन
श्रीहरीचे वेध ते

येऊ दे जुळुनी मनीच्या
हळव्या तारा आपुल्या
चालू दे या प्रीतभरल्या
बावळ्या कथुल्या खुळ्या

दि.१७/१२/२०२४
रात्री ११.२९ वा.



## (२२)
## पैंजणांचा नाद माझ्या

पैंजणांचा नाद माझ्या ऐक राजा
काय सांगतात चंचल घुंगरू
चालता मी चालतात तेही ना
छन्? छना छन्? स्वर होई बघ सुरू

पावलांच्या सोडतात ज्या खुणा
घुंगरांच्याही असे काही मना
का विसरतो तू तुला नादात या
सांग ना माझ्या प्रिया रे साजणा

आले तुझ्या घरात ज्या दिनी सख्या
वेध घेत तू सदा मागे तसा
आजही मला हवे हवे तुझे
मनविण्या यावास माझ्या राजसा

दिनभरी आवाज मंद होतसे
रातीला किती ठळक ते बोलती
नूपुरांच्या संगतीने चालणे
गोडव्यांचे नाद ऐसे घोळती

तू पुन्हा देशील नक्षीदार ते
उपहार मजसी पैंजणांचे देखणे
मी पुन्हा प्रीतीत जपल्या ज्या खुणा
त्या मधुरशा आठवांना रेखणे

दि.१८/१२/२०२४
रात्री १०.४९ वा.



## (२३)
## तुझी प्रिय राणी हिरमुसली

अशी मी वाट पाहुनी
थकून जाते प्रिया किती रे
तुला कळणार कधी वेड्या
माझी ही असीम प्रीती रे

दाराशी खिळते ही दृष्टी
मन तुझ्या वाटेवर लागे
मी जाते हरवुनी मजला
न कळते का अशी मी वागे

कळी सुकते मी उगा बसते
खिन्नता घेरुनी जाते
मी तुझ्या आठवांच्याच
गावी नित ही फिरूनी येते

कसे सांगू जीवा लागी
अशी होते घालमेल
समोरी तू असावास
साधला जाई ताळमेळ

अशी ही ओढ का लागे
कसे समजावू मी तुजला
जरा समजून तू घ्यावे
प्रिया ना सांगता मजला

पहा डोळ्यात तू माझ्या
ही विरही आस आसुसली
जरा भेटून पाहून जा
तुझी प्रिय राणी हिरमुसली

दि.२१/१२/२०२४
रात्री ०८.५० वा.



## (२४)
## हात तुझा रे धरून जाईल

झुरून जाईल तुझी सखी रे
संपली तरी उरून जाईल
तूच जर कधी अव्हेरले तर
मरणालागी स्मरून जाईल

क्षण प्रेमाचे तुझे आठवून
जन्मोजन्मी तरून जाईल
जीव सोडला तरीही संचित
तुझ्याच नावे करून जाईल

कधी सुन्या अंधाऱ्या राती
प्रीतचांदणे झरून जाईल
आले संकट झेलून घेता
चक्रची सारे फिरून जाईल

रिक्त होत जरी गेले कधी तरी
तुझी मी झोळी भरून जाईल
वाहत वाहत कालौघातून
हाक दिलीस तर ठरून जाईल

असे तुझे रे जग स्वप्नीले
क्षणाक्षणाला करून जाईल
सावलीरूपे येत साथीशी
हात तुझा रे धरून जाईल

दि.१०/०१/२०२५
सकाळी ०८.१० वा.



## (२५)
## रेखा नव्या उमटल्या

सांगू तुला प्रिया मी
नजरेस दृष्टी लाभे
माझ्यासवे सख्या तुज
सुंदरशी सृष्टी लाभे


जीवन जरी असे ते
जगणे नवेच देईन
देऊन सौख्य तुजला
दुःखे उरात घेईन

कसल्या मनात चिंता
सोडून दे आता तू
बघ मार्ग मोकळा हा
चालून घे जरा तू

भीती अनामी संपो
घे श्वास गंध भरले
वारे नवेच वाहती
सुमधुर सुगंध भरले

घेऊन हात हाती
रेखा नव्या उमटल्या
जन्मांतरीच्या काही
ऋण देणग्या की फिटल्या

दि.१९/०२/२०२५
सकाळी ०८.१९ वा.



## (२६)
## प्रीतशिल्पाच्या लेण्या

समईतल्या वातीसारखी
तेवत राहीन तुजसाठी
दो नयनांच्या दो ज्योतींनी
वाट पाहणे तुजसाठी

सांज सकाळी तुझीच पूजा
हृदयमंदिरी देव्हारी
काळजातल्या कपाटात तू
तूच आतल्या गाभारी

सुगंध येईल तुला साजणा
भावफुलांच्या माळेचा
घे गुंफून तू हार गळ्यातच
गोड मिठीतील प्रणयाचा

अत्तर तुजला स्वप्नफुलांचे
तिलक प्रीत गंधाचा
इंद्रधनू खुलवीन सख्या
मी राधा तू श्याम रंगाचा

बसले आहे तुजला पाहण्या
मनात कोरुन घेण्या
रोज रेखिते तुझ्याचसाठी
प्रीतशिल्पाच्या लेण्या

दि.२०/०२/२०२५
रात्री १०.५८ वा.



## (२७)
## तिची रेखा दे रे देवा

कसे जमते तुला गं
सदा हासत राहणे
डोळा पाणी ना आणता
नित स्नेहाने पाहणे


वात्सल्याची तू माऊली
माझी आधार साऊली
प्रीत देत जाशी राणी
पदोपदी नि पाऊली

तुझा हात हाती
असो सदोदित सोबतीला
तुझी साथ मला लाभो
जन्मोजन्मी संगतीला

तुला पाहतो न जेंव्हा
माझा मीच मला लाभे
आत वेणू वाजते नि
मदनाचा सूर गाजे

अशी असावी सोबती
सखी जन्माची साथी
तिची रेखा दे रे देवा
झळाळती एक माथी

दि.२८/०२/२०२५
रात्री ११.४८ वा.



## (२८)
## हे स्त्रिये तू आदिमाये

सोड तू पाऊलखुणा
या तारकांच्या अंगणी
एक चमचमती तुझी तू
होऊ दे ना चांदणी

मोजताना नभ तुझे तू
व्यास मोठा कर जरा
केंद्रबिंदूच्या सभोवती
तुज सुखाचा जरी गरा

एक एका पादाक्रांतून
तू शिखरे गाठून जा
तू कितीही विस्तारलीस तरी
आत खोल साठून जा

हे स्त्रिये तू आदिमाये
आदिशक्ती प्रभाविनी
तूच आरंभाची माया
तूच अंताची रागिणी

तुज नमन माझे नमन घे
अर्घ्य घे तूच चरणी गे
काल स्थल देवी देवता वा
तुजमुळे सत्करणी गे

दि.१०/०३/२०२५
रात्री ०९.४४ वा.



(२९)

**हुरहूर लागे जीवा...**

हुरहूर लागे जीवा
कुठून हे काहूर माजे देवा
कधी काळी मज भाग्यावरती
वाटत होता हेवा
हुरहूर लागे जीवा...

जीवलग ज्याला समजत होते
तो नच प्रियवर भला
खेळ घडीचा घडीभर चालून
सांग कसा संपला
हुरहूर लागे जीवा...

तोच दिवस अन तीच रात्रही
तरीही उदासी मनात का
वाट कुणाची पाहू आता
इतुका दुरावा क्षणात का
हुरहूर लागे जीवा...

इथे बैसलो इथेच हसलो
तिथे हुंदडलो भराभरा
येऊ दे तुला आठव माझी
जाण राहु दे तुला जरा
हुरहूर लागे जीवा...

जीव जडविला तुला न कळला
तू तर मस्तीतील हवा
नव्या दिशा अन नव्याच वाटा
तुला लागला छंद नवा
हुरहूर लागे जीवा...

दि.०८/०४/२०२५
सकाळी ०६.३८ वा.

## (३०)
## नाते भासे अनोळखी

ज्यासाठी तुटले काळीज कधी
ते नाते भासे अनोळखी
कसे विसरती लोक क्षणातच
ऋणानुबंध नि त्या ओळखी

जे सर्वस्वाचे दान होते कधी
आता नवखे का व्हावे
कुणी कधीतरी किती साहले
सहजी विसरून का जावे

जे रंग जीवनी होते भरले
तेच हात कसे सोडावे
जन्मोजन्मीचे नाते जोडता
तेच कुणी कसे तोडावे

ज्या मनाने मन वाहिले
त्यास कसे मग विसरावे
समज नव्हे मग गैरसमन किती
कुणी कशाला पसरावे

वळण वेगळे येता अवचित
वाट वेगळी का धरली
दिशा संपल्या अंधारातून
मिणमिण पणती बघ उरली

दि.०९/०४/२०२५
सकाळी ०७.२४ वा.



## (३१)
## सुमन जुई

जुईच्या नाजूक फुलासारखं
मन माझं राजा
गंध तुला देईन
स्पर्श कोमल अनुभव जा

हळव्या माझ्या भाव पाकळ्या
हळव्या किती कळ्या
वेलीवरती उमलून येतात
मानसीच्या सगळ्या

ऋतू जसे येतात न
हिंदोळते मन
तुझ्यासाठी हळवे रे
या जुईचे तनमन

सुगंधाचा तू वेडा
सुरभित मी
तुझ्या माझ्या प्रीतीने
पुलकित मी

जपशील मन माझं
सुमन जुई
आकाशाचा आधार हो
मी तुझी भुई

दि.१२/०४/२०२५
सकाळी ०६.४८ वा.

## (३२)
## वेदनेचे आभाळ

ढग जमतात दुःखाचे
उदासीचा वारा सुटतो
कोंडलेल्या भावनांचा
आवेगात बांध फुटतो

कसे थांबवावे त्याचे बरसणे
खोल त्याची आर्तता
कुठल्या तरी तीव्र जखमांची
हमसून रडण्यातली पूर्तता

भेसूर गरजतात ते मेघ
विजांचा घाबरवणारा कडकडाट
खुपणाऱ्या घटनांचा
चाले नंगा थयथयाट

झाकोळून जाते तेंव्हा
सारे जणू जगणेच
तरीही सोसून भोगून
आनंदाने वागणेच

आत किती रडते माहितीय का
प्रत्येकाचे वेदनेचे आभाळ
आपापल्या जखमा, व्रण, दुखरे प्रसंग
तडाख्यांचे आघात नि कुणी शब्दबंबाळ

दि.१५/०४/२०२५
सकाळी ०७ ३९ वा.

## (३३)
## मन उगाच होतं हळवं

मन उगाच होतं हळवं
डोळ्यातून आसू गळती
कधी कुणी बोलले काही
ते अर्थ खोलवर कळती

हळव्याच भावना वेड्या
बांधावर ढुसपुस करती
काळीज भात्याच्या संगे
त्या श्वास दडपले भरती

हळवेपण वेडे वाटे
ते वाट रोखते जगता
लपवावे कसे किती मी
रडू कोसळता पण जगता

हळव्याच फुलांच्या कोशी
हळवेच गंध दरवळती
ते सुगंध हळवे होती
जे भाव मनासी फळती

मी आत खोलवर रुजते
मी चिंब हळवीशी भिजते
हळव्या ह्रदयाच्या काठी
हळवेपणास नित पुजते

दि.१६/०४/२०२५
रात्री ११.२८ वा.



## (३४)
## माझे सुखाचे चांदणे होशील

वाटलं मला आता तू
माझे सुखाचे चांदणे होशील
किती अंधाऱ्या राती नंतर
आल्हादाची गाणी गाशील

दैवदत्त अमावस्येच्या
खाईत गर्द दुःखाच्या
आयुष्य मज होरपळले रे
वाटा दावशील सुखाच्या

देईन तुला ऊन साहून
आजही सावलीच दाट
भावसरिता ओथंबलेली
आसुसलेला तिचा काठ

कुठेतरी मनामध्ये
पौर्णिमा उजळली आहे
चांदण्याच्या वाटेवरती
स्वप्नवेली फळली आहे

तुला कळेल का कोणास ठाऊक
चांदण्याचा चंद्र होणं
दुःख माझे दूर नेता
ग्रीष्म दाह मंद्र होणं

दि.१८/०४/२०२५
सकाळी ०७.११ वा.



## (३५)
## आज मला कळते

आयुष्याला कंठत गेले
आज मला कळते
आल्या दिसाला ढकलत गेले
आज मला कळते

क्षणाक्षणाला क्षण जळले रे
आज मला कळते
मनामनाच्या तारा न जुळल्या
आज मला कळते

जीवनचुलीच्या आत निखारे
आज मला कळते
आवरत गेले सर्व पसारे
आज मला कळते

घासही अडला ओठापाशी
आज मला कळते
आसू रडले पापणीशी जे
आज मला कळते

उचलून पेलत गेले ओझे
आज मला कळते
वाकून गेले पार कण्याने
आज मला कळते

सरले जगणे नकळत कैसे
आज मला कळते
व्यर्थ साहणे वाट पाहणे
आज मला कळते

दि.२१/०४/२०२५
सकाळी ०८.१३ वा.



## (३६)
## आई वेडी एक बेडी

इवल्याशा पावलांचे
सुख अनमोल
दुनिया आईची फिरे
लेकरांभोवती गोल

श्वास कसे भारलेले
त्याच्या श्वासाने
जगणेच जणू भरे
त्याच्या ध्यासाने

पाजविता पान्हा कान्हा
सुखावीत जाय
किती उपकार त्यांच्या
मुळे घडे माय

चुकलेल्या हुकलेल्या
क्षणांना मागते
आई वेडी एक बेडी
अजब वागते

कुणी म्हणे पाळण्यात
दिसतात पाय
कसेही असले बाळ
माया होत जाय
आई माया होत जाय

दि.२४/०५/२०२५
सकाळी ०८.४९ वा.



## (३७)
## चिमण्या स्वप्नातून रमे आई

चिमणे चिमण्या मस्त दंगल्या
डहाळीवर झुलत्या
चिव चिव चाले धुंदीमध्ये
ऋतुराण्या फुलत्या

हिरव्या हिरव्या पालवीत का
लपाछपीचा डाव
जागवीत ह्या जाती चिमण्या
सुखासुखीने गाव

त्या असताना जाग सहजशी
नीज चिमणीची होते
चिमणी गाणी गात बाळाची
आई अंगाई गाते

मग येती ह्या चिमण्या राण्या
कथेतल्या नायिका
चिमण्या ओठाच्या बाळाचा
गोड पापा प्रत्येका

चिमण्या जिवनीमधुन डोकवती
चिमणे चिमणे दात
चिमण्या स्वप्नातून रमे आई
चिमण्या पापणी आत

दि. २५/०४/२०२५
सायं. ०६.३८ वा.



## (३८)
## जन्म सारा तुझ्यासाठी

ये न बाळा आईच्या रे कुशीत खुशीत
वात्सल्याचा पान्हा मिळे मायेच्या मुशीत

रूप तुझे लेकरा रे बालमुकुंद
अंगाखांद्यावर खेळे गोड गोविंद

तुला अंजारता गोंजारता सुख वाटे
आईपणाचीच मला लागे भूक वाटे

जन्म सारा तुझ्यासाठी श्वास वेचले
जगताना मरताना ध्यास घेतले

छबी तुझी मनामध्ये जीव दंगला
तुझ्या भोवताली माझा जन्म रंगला

दि.०५/०५/२०२५
सकाळी ०७.४६ वा.



## (३९)
## भावनांचा गलबला

नभ दाटले दाटले
मग आभाळ फाटले
आत एक माझ्या वेड्या
मला काहूरा गाठले

सोशीयेल्या तापलेल्या
संसाराच्या किती झळा
आत उठतात किती
वेदनेच्या खोल कळा

जखमांच्या वणामध्ये
जगलेले खुपलेले
आत शिलगत्या दुःखा
सांगा काय बोचलेले

काटे अनंत टोचती
शल्ये काळीज विव्हळ
कसे मोजावे मनाचे
झाले अमाप शकलं

वारा हिव देत व्हता
आता वावटळ झाला
कसं सांगू हृदयात
भावनांचा गलबला

दि.०६/०५/२०२५
रात्री ११.५७ वा.



## (४०)
## **भेटकलिका सानूल्या**

तिन्ही सांजेला नेशी का मला
निवांत नदीच्या काठी
जिथे सांधले पूल आपुले
भावप्रीतीच्या गाठी

रात होऊनी मिटण्या आधी
दिवाकराचे बिंब
होत जातसु परस्परांच्या
प्रेमातून की चिंब

रंग सांजेचे आकाशातून
पसरून जाता जाता
मी तुला लाभले आहे कितीदा
हरवून गाता गाता

विसरून मजसी जात असे मी
तूच तू सांजेकाठी
अल्याडही तू पल्याडही तू
मनी सांजेची दाटी

जशा रंगल्या रंग लेऊनी
त्या तरुवर पानूल्या
किती ओळखून घ्याव्या राजा
भेटकलिका सानूल्या

दि.०९/०५/२०२५
रात्री ११.४८ वा.

## (४१)
## आता कुणास सांगू

आता कुणास सांगू
या वेदना मनीच्या
पाळून जीव दमला
नियमांस ह्या जनीच्या

उठतात कळा आतून
आक्रंदतात भाव
तरी राखते मुखावर
काही न झाले आव

काळीज कोपऱ्यात
बसुनी उदास वाटे
मग घोर अतिघोर
तमाभाळ मनी दाटे

ढळले चुकून वेडे
आसू उरात जे ही
अन एकटेच वाटे
नाही कुणी कुठेही

आवाज देत गेले
ऐकू न कुणा आले
मग सावरून स्वतः
चालून मार्ग गेले

दि.१४/०५/२०२५
रात्री ११.४३ वा.

## (४२)
## दिसते नवेच स्वप्न

दिसते नवीच आशा
आभाळ भेदलेली
माझीच त्रिज्या आता
मी आहे छेदलेली

शून्यात पाहताना
शून्यास ओलांडले ना
दुःखात गोठलेले
क्षण काही सांडले ना

मागेच सोडले मी
ओसाड गाव माझे
आता पुन्हा नव्याने
घरटे नवेच माझे

विणले नवेच धागे
विणल्या नव्या दिशाही
आता मला लुभवती
येता नव्या उषाही

शिरते कुशीत माझ्या
निजले जरा जराशी
दिसते नवेच स्वप्न
आता मला उराशी

दि.१६/०५/२०२५
रात्री १०.४९ वा.

## (४३)
## चुकते जगायचे अन

सांगा कुणास आता
भेटावयास जावे
ना सूर ताल काही
कैसे तराणे गावे

ज्याचे नि त्याचे आता
मन हे संकोचलेले
नाही विचारपूस
म्हणे बोल बोचलेले

आकाश बांधलेले
घरट्यात ज्याचे त्याने
अन रंग वेगळाले
लेवून माणसाने

किती कुंपणे पहावी
अन उंबरा पळाला
लागे सुखाचा का हो
मासा कुणा गळाला

चुकते जगायचे अन
माणूस खुंटलेला
आता कुणी न बोले
म्हणे जीव खुंतलेला

दि.१९/०५/२०२५
सकाळी ०९.३२ वा.

## (४४)
## लिहून भाळी दिले जे आहे

कुणी बांधल्या आकाशातील
ग्रहबोलांच्या गाठी
कुणा उतरले अवनी वरती
सांगा कुणाच्यासाठी

कधी न कळते माझ्या मनाला
कोडे ना उलगडते
प्रसंग घटना सारे कैसे
कशाप्रमाणे घडते

सगळे असते जणू लिहिलेले
मीच नव्याने जगते
मला वाटते मीच हे केले
संचित असते मग ते

फुका मिरवते मी ज्यासाठी
ते तर आशीष त्याचे
म्हणून आता कर्म पहावे
सुधरून ज्याचे त्याचे

त्रयस्थ होऊन मलाच मीही
साक्षी होऊन जावे
लिहून भाळी दिले जे आहे
मस्त मजेने गावे

दि.२३/०५/२०२५
रात्री ११.४२ वा.



## (४५)
## अन्य काय मज सांग हवे

उगाच वाटे मला कधी की
जरा जरासे मी हुंदडावे
कधी होऊनी सागर लाटा
कधी धबधबे होत पडावे

त्या फांदीवर घरटे माझे
आणि पिलांची चिवचिव किलबिल
होत पक्षिणी देत निवारा
मीही पहावी गंम्मत चिलबिल

तिथे नभातून माळ ढगांची
कधी पांढरी कधी काळी
कधी कोळ्याने होऊन पहावी
मीही विणलेली जाळी

कधी गवतावर होऊन इवली
सानसानुली फुले कवळी
कधी होऊनी फुले सुगंधित
घ्यावे फुलपाखरू जवळी

वाटे हवेवर जावे तरंगत
कधी पंख लेऊन नवे
आणि असे जर घडले तर मग
अन्य काय मज सांग हवे
देवा, सांग हवे

दि.२४/०५/२०२५
रात्री १२.५४ वा.



## (४६)
## मनात माझ्या स्वप्नपालखी

हवा गारवी शिरशिर शिरवी
ओल्या धुक्याची ओल नवी
इथे एकटी गीत तुझे मी
ऐकताच उमले पालवी

सूर तुझे उमटून खोलवर
झाकझाकले नयन कधी
गीत गोडवा ओठी अडला
झरते अमृतमयी नदी

प्रीत वाढते गोडी चढते
आयुष्याची साथ अशी
धुंद धुंदते सखी प्रिया तव
विसरून जाते स्वत्व कशी

अशी सांज मग मनात येते
जरा टेकण्या निवांतता
अलगुज देते सांगून वेडी
मंद रातराणी शांतता

ये ये राजा क्षणात येथे
तुझी रागिणी वाट बघे
मनात माझ्या स्वप्नपालखी
सजुनी धजुनी रोज निघे

दि.२५/०५/२०२५
रात्री ०९.४४ वा.

## (४७)
## पोकळी नात्यात होते

पोकळी नात्यात होते
आणि सारे फोल ठरते
संपते ते प्रेम आणिक
दूरी केवळ हाती उरते

जीव जेथे जडविलेला
का जीवावर कोणी उठते
आरोपांच्या गोळ्या झडती
गाठ सैलसी होत सुटते

ती दिलेली आर्त हाक न
आता कोठे पोचते
वाऱ्यासंगे बोलणेही
उडून व्यर्थचि बोचते

हात निसटून साथ सोडून
जाय कोणी दूर जे
भावनांच्या हुंदक्यांनी
कोंडलेले पूर ते

वाटते आता अनामिक
कोणीही ना जवळचे
नाव ज्याचे घ्यायचे ते
कोण आपुले नवल ते

दि.०२/०६/२०२५
रात्री ११.५६ वा.

## (४८)
## भाग्यरेखा जोडताती

आता कुणाच्या ओळखीचे
सूर सांगा गवसले
का कुणा पाहून कोणी
गोड गाली हासले

कोणती ओळख पुराणी
की नवी ही बंधने
काहीही ना बंध असता
ओळखू ये स्पंदने

कोण जुळवून देतसे हे
संचितांचे गाठोडे
का कुणा सोबत उगाचच
वाटते चालू थोडे

भाग्यरेखा जोडताती
का कुणा आणि कसे
का क्षणातच चित्र हवेसे
ना कळे कैसे दिसे

कोणत्या या मांडलेल्या
सोंगट्या खेळातल्या
कोण नियती जाणणे अन
जाण संकेतातल्या

दि.०४/०६ २०२५
रात्री ११.३२ वा.

## (४९)
## **सांगणे सोपे खरे पण**

सांगणे कोणास व्यर्थ
बोलणे बोलायचे
एकट्याचा जन्म इथला
एकटे सोसायचे

ज्या कळा उठल्या उरातून
त्या कुणा कळणार का
जीवनाचा संगी साथी
तो खरा मिळणार का

सोबतीने विश्व चाले
पोकळी तरीही पहा
या पसाऱ्यातून वेड्या
माणसा विलगी रहा

जे हवे वाटे जीवाला
सांगणे ते ईश्वरा
संचितांचे भोगणे मग
मागणे का परमेश्वरा

सांगणे सोपे खरे पण
वागणे खडतर किती
एक वाटे रोज आतून
मन मनी कसली भीती

दि.०५/०६/२०२५
सकाळी ०९.३६ वा.




## (५०)
## जन्म मिळो मज फुलाफुलांचा

पिवळ्या धम्मक फुलात कोणी
पहा हळद सांडली
कोमल रेशमी शोभिवंत जणु
आरास हो मांडली

कळ्या कोवळ्या डोकावून त्या
पाहतात हळुवार
तीर तयांचे काळजास मग
जाती भुलवुनी फार

पराग डोके वरती काढुनी
हसती मोदभरे
जणू कुसुमराण्यांच्या मुकुटी
कांचनभरले तुरे

वाऱ्यासंगे सख्य चालते
सुगंध पसराया
पहा फुलांच्या सुंदर रमण्या
दुःख हो विसराया

गालावरती स्पर्श ते हळवे
फुलास फिरवावे
जन्म मिळो मज फुलाफुलांचा
मी ऐटीत मिरवावे

दि.०९/०६/२०२५
सकाळी ०९.०३ वा.



## (५१)
## पारदर्शीपण कसे लाभायचे

पारदर्शक मन माझे वाचून घे
आतले जे जग माझे समजून घे
काय लिहिले आहे मी तेथे पहा
ते तुझ्यासाठीच रे उमजून घे

शांत थोडा डोकवून पाहशील ना
तू तिथे माझ्या मनी राहशील ना
मी तुझ्या प्रेमात दिधले सर्वस्व रे
तू तुझे काळीज मजसी वाहशील ना

भावनांची ती सरिता आत वाहे
ओतप्रोत प्रीतलाट खळखळाळे
स्वार तू होऊन त्यावर पाह ना
तेज एक प्रेमरूपी बघ झळाळे

वाट मी पाहे किती तुजला कळे मग
तू किती माझाच आहेस तुज वळे मग
जाऊनी विरल्या नको त्या कल्पना
स्पष्ट आणि स्वच्छ चित्र आकळे मग

पारदर्शीपण कसे लाभायचे
या जगी तू सांग कसे वागायचे
मी अशी आहे तू घे समजून की
पारदर्शी होत तू जागायचे

दि.१४/०६/२०२५
रात्री ११.३२ वा.



## (५२)
## उमेद उरातुन असताना

बघ बघ तिथले आभाळ आपुले
कधीतरी मग उडायचे
मनसोक्तपणे नभात विहरत
उंच उंच मग चढायचे

येईल आई घेऊन दाणे
रोज मनाने टिपायचे
डोळ्यामध्ये स्वप्नं एकची
उडण्याचे मग जपायचे

देवाने हे पंख दिले जे
वरदानच जणू आपुल्याला
जरा प्रयत्ने कलेस शिकणे
उंच भराऱ्या उडण्याला

माय वसुंधरा माया करते
दाणापाणी दे जगण्या
उंचावरुनी खुणावतो ना
बाप नभाचा बळ भरण्या

डोळ्यांमध्ये येवो करारी
नजर भरारी दिसताना
नको इवलीशी सुध्दा ही भीती
उमेद उरातुन असताना

दि.१५/०६/२०२५
रात्री ०१.२७ वा.



## (५३)
## राम नामाचे घुंगरू बांधायचे

श्वासालाऽऽऽ,
राम नामाचे घुंगरू बांधायचे
जीवा शिवाचे, जीवा शिवाचे,
जीवा शिवाचे सांध हे सांधायचे ।।धृ।।

दिले मोजून जगतात येताच श्वास
राम नामाची जडेल जेव्हा ती आस
जाता जाता ही राम आत येताही राम
नाम नामात रॅम हे सांगायचे
राम नामाचे घुंगरू बांधायचे
श्वासालाऽऽऽ,
राम नामाचे घुंगरू बांधायचे ।।१।।

जगण्याची तऱ्हा ज्याला जमली पहा
अळवाच्या पानावर दवच हा,
संसार दवच हा
इथं रमून उरून जायाचे ना
रामनामाचे सोपान चढायचे
राम नामाचे घुंगरू बांधायचे
श्वासालाऽऽऽ,
राम नामाचे घुंगरू बांधायचे ।।२।।

जीव मधात घुटमळणारी माशी
लोभ मोहाची करकच गळा फाशी
काय माझे माझे, काय सांग तुझे
सारे  इथले इथे सोडायचे
राम नामाचे घुंगरू बांधायचे
श्वासालाऽऽऽ,
राम नामाचे घुंगरू बांधायचे ।।३।।

दि.१६/०६/२०२५
रात्री ०१.५७ वा.



## (५४)
## इथे फिरस्ती कितीतरी

भूल पडते मनास माझ्या
कुठे कोणत्या जगात मी
मार्ग चालते नवे नव्याने
आणि माझ्या संगतीस मी

नव्याच इथल्या रोज सकाळी
नव्या उषेच्या नव्या खुणा
नव्या जगातील नवीच स्वप्ने
नव्या निशेला पडती पुन्हा

निशा कोणत्या जरा उशिरा
क्षितिजावरती पेंगुळल्या
प्रभातवेळी खुणा निशेच्या
उषेसाठी का रेंगुळल्या

थंडी इथली बंड पुकारे
उन्हात उडती मोद फवारे
कुठे उन्हाच्या झळा बोचती
कुठे उन्हाचे उष्ण तुषारे

मस्त धुंदीतुन रस्ते इथले
तारुण्याच्या मदात बुडती
काळ्या गोऱ्या आणि सावळ्या
सौंदर्याच्या पतंगी उडती

स्वतःत रमल्या जगात फिरती
इथे फिरस्ती कितीतरी
पुन्हा नव्याने जुन्या जगातच
जाण्यासाठी कधीतरी

दि.२४/०६/२०२५
रात्री ०८.३९ वा.



(५५)

## जीवन आनंद दुनावे

जगण्याची मजा घेऊ या
आयुष्य सुंदर आहे
जीवन क्षणभंगुर तरी
क्षण क्षणात कलंदर आहे

उडत्या वाऱ्याच्या संगे
लेऊन पंख मी उडते
विसरून सारे काही
काही नव्याने हे घडते

आकाश तेच जरी आहे
मज रंग वेगळे दिसती
त्या छटा आगळ्या वाटून
मेघही मस्तीतून हसती

शिडकाव थोडासा होतो
ते तुषार देती दिलासे
अन डोकावणाऱ्या उन्हांचे
उबदार उबेही खासे

ती नदी वाहताना मज
नवं वळणावरती खुणावे
ते सारे तसेच तरीही
जीवन आनंद दुनावे

दि.२८/०६/२०२५
रात्री ०९.३९ वा.



## (५६)
## नाहलेली जलपरी

रिमझिम रिमझिम पावसा
तू खुळा वेडा असा
ताप देत्या त्या उन्हाचा
तूच होशी रे दिलासा

आज भिजले चिंब ओली
मी अशी गेले सुखावून
आठवांच्या लाटेमध्ये
आपसूक गेले मी वाहून

थेंब अंगावरती झेलून
मी किती रे तृप्तशी
मोद सरिता वाहते मज
नित मनातून गुप्तशी

ओलसर मम कुंतलातून
गंध पवना तू  वहा
राजसा डोळ्यात माझ्या
प्रीतवर्षा तू पहा

बरसू दे मेघातल्या त्या
थंड शीतल जलसरी
आज माझी मीच भासे
नाहलेली जलपरी

दि.३०/०६/२०२५
दुपारी ०४.२६ वा.



## (५७)
## स्त्री असे ऐसी सुजन्मा

पावसाच्या हे सरींनो
आज बरसून जा तुम्ही
या भुईवर अंग तुमचे
टेकवून मग द्या तुम्ही


बीज लपले जे असे ते
त्यास कुरवाळून घ्या
देत ओलावा तुम्ही त्या
थोडे कवटाळून घ्या

अंकुरांच्या कोंबकोंबा
चुंबुनी घेता जरा
जीव नवं जन्मास येती
हिरवाई लेऊन धरा

मग जरा त्या पर्वतावर
त्या नदीचे अंग व्हा
सागराच्या ओढीपोटी
साथ देण्या संग जा

भेटुनी आता तयाला
रूप वाफेचे धरा
स्त्री असे ऐसी सुजन्मा
सार्थ त्या जन्मा करा
हे सरींनो, सार्थ व्हा

दि.०४/०७/२०२५
रात्री ०९.३२ वा.



## (५८)
## श्रीहरी रे श्रीहरी

कोण छेडी बासुरीचे
सूर पैलाच्या तिरी
धावते मन जपते आणिक
श्रीहरी रे श्रीहरी

श्वास येती आणि जाती
वेणूची ती धुन खरी
आतले ते स्वर निनादुन
बोलते मग वैखरी


सप्त सूर जे गीत गाती
भावनांच्या संगती
मोहनाच्या मीलनाचे
स्वप्न क्षण मनी रंगती

एकदा व्हावे तुझी मी
बासुरी मनमोहना
अधरी धरीशी एकताना
हृदय बोले भावना

मी तुझी आहे तुझी रे
साधिका अन प्रेमिका
जन्म ओलांडून आले
पाहशी मी अनामिका

मीच राधा आणि मीरा
अथवा गोपा गोपिका
रंगी रंगून जात आहे
कृष्ण तू मी संगिका

दि.०५/०७/२०२५
रात्री ११.५४ वा.



## (५९)
## आषाढातील पाऊसधारा

आषाढातील पाऊसधारा
मेघमाळ तोरणे अंबरा
झरझरणाऱ्या सरीसरीतून
एक प्रीतीचा वाहतो झरा

मधेच पडते ऊन चमकते
आणिक मध्ये तेज दमकते
आता वाटते गेला पाऊस
टपटप थेंब नर्तकी ठुमकते

इकडे वर्षा तिकडे उन्हाच्या
खेळ सोंगट्या सारीपाटाच्या
मग डोकावे इंद्रधनू अन
कळ्या फुलाव्या मनरंगाच्या

सांग सांगतो मास मनीचा
दूत हो सख्या मेघा सखीचा
दे संदेशा व्याकुळ गाथा
भाव जाण तू माझ्या मनीचा

अंगावरती येतो शहारा
श्रावणदारीऽऽ आषाढ पहारा
तप्त मनाच्या भूमीवरती
आषाढच हो नित्य उतारा

दि.०७/०७/२०२५
रात्री ११.४७ वा.



## (६०)
## माझा चांदवा तू सदा

चांदण झऱ्याच्या
आज काठावर रमू
एक पूनव मनात
चल तिच्यातून गमू

मन चकोर होताच
भूक चांदण्याची कळे
वाट पाहणे पाहणे
त्यात नाहताना फळे

अशी शीतलता कोठे
कधी कशी सापडावी
भेट आगळी रे तुझी
माझ्याशीच ती घडावी

चांदण्याचा झुला प्रिया
माझ्यासाठी बांध ना रे
माझा चांदवा तू सदा
होशील का सांग ना रे

मग सोशीन कितीही
राती अंधाऱ्या उदास
पुन्हा लाभशील तूच
पुऱ्या चंद्राचा ही आस

दि.१०/०७/२०२५
रात्री १०.४२ वा.



## (६१)
## सुख स्वर्गीय हे इथेच आहे

तुझ्या  नि माझ्या मनातले तर
भल्या पहाटे घडून गेले
अबोल होऊन बकुळ म्हणते
नवेच काही फळून आले

किती दिसांचा असा दुरावा
क्षणात आता मिटून गेला
पुन्हा नव्याने रतीमनावर
मदनबाण हा सुटून गेला

अलगद माझे केस मोकळे
गंध पसरुनी दिगंती उरती
शयनकक्ष बघ महाल झाला
शृंगाराला येऊन भरती

स्पर्श दिलासे हलके उसासे
कळ्या उमलल्या मनात काही
तुझ्या नि माझ्या भेटीतून हे
भाव अनामिक उठले पाही

सरली निशा उजडूनी उषेला
अजूनही मी तिथेच आहे
तुला पाहते जवळ राजसा
सुख स्वर्गीय हे इथेच आहे

दि.२५/०७/२०२५
रात्री ११.४९ वा.



## (६२)

## असो मोकळे श्वास आकाश तारे

नको चंद्रतारे  ते स्वप्नील धुमारे
मला दे सख्या तू माझे माझे किनारे

नको देऊ काही तू उपमा नव्याने
जपावे मला मी जशी आहे ना रे

नको दूषणे भूषणेही तुझी ती
मला नित्य प्रेमात तू पाह ना रे

नको देऊ वचने उद्याची कधीही
जगू दे मला आजचे धुंद वारे

नको बंद कोशी मला जखडू राजा
असो मोकळे श्वास आकाश तारे

येईन जेंव्हा तुझ्या सोबतीने
जपावे तू सन्मान स्त्रीत्वाचे सारे

दि.०७/०८/२०२५
रात्री ११.४३ वा.



## (६३)
## श्वास भरू दे रे मला

श्वास भरू दे रे मला,
मोकळे जरा असे
मिटून लोचनांस मजसी
चित्र वेगळे दिसे

रम्य सृष्टी संगती
गीत उमटते नवे
स्वप्नं पाहू दे मला
त्यात लाभे जे हवे

सजविलेली मी तनु,
हळवी मृदुली ही मनु
रोमरोमी सांधते
प्रीतवीण कणकणु

आतले आवाज
मी ऐकते जरा जरा
गंध एक आगळा
हुंगते खरा खरा

सोड थोडे एकटीस
एकटी मी बोलते
वेलीवर फुलांसवे
हलके हलके डोलते

दि.१५/०८/२०२५
रात्री ११.५८ वा.



## (६४)
## मदनसुंदरा रहा तू संगी

कसे सांगू तू वाचून घे
भाव  ओठात दबलेले
शब्द अडतात का तेथे
प्रीतीच्या गावी रुजलेले

कशी पाहू तुला सजणा
नजर आहे रे झुकलेली
तुला कळते का बघ वेड्या
लाज गाली चमकलेली

एक वागे उनाडशी थोडी
बट माझी ती वाऱ्यावर
नाही कधीचे तुझ्याविन ते
हृदय माझे रे थाऱ्यावर

कुडी कानात मोत्यांची
कुजबुजते हळूच काही
म्हणे अलवार प्रियतम गे
तुझ्या गजऱ्यात का राही

डोरले गळ्यात शेंदूर भांगी
तुझ्याच नावे प्रीत अभंगी
अजोड जोडा जन्मोजन्मीचा
मदनसुंदरा रहा तू संगी

दि.१६/०९/२०२५
रात्री ०१.३६ वा.

## (६५)
## माझ्या मनाच्या कुपीत

माझ्या मनाच्या कुपीत
अत्तराचे कण किती
काही हासू आणि आसू
जरा जोश जरा भीती

माझ्या मनाच्या कुपीत
दडलेली एक कुपी
बडबडणाऱ्या सख्या
एकांताची आहे चुप्पी

कधी भरलेले क्षण
कधी भारावले मन
कधी ओढ ओढणारी
कधी उसासे गरम

माझ्या मनाच्या कुपीत
एक कालचाही काळ
एक जगते मी आज
भावी सोनेरी सकाळ

माझ्या मनाच्या कुपीत
दडलेले खूप काही
काही सांगेन कदाचित
काही कधीही ते नाही

दि.१८/०९/२०२५
रात्री ०९.४७ वा.

## (६६)
## मागे उर्मिला ठेवली

पतीराजा प्रिय सख्या
स्वप्न फुले जीवनात
आले वरून प्रियाला
छवी सुखाची मनात

कसे सांगू मी कुणाची
दृष्ट लागली कुणाला
दिसे जरी राम सीता
गेले वचनी वनाला

पाठीराखा माझा सखा
होत रामाची सावली
साऱ्या त्यागाची कथाच
मागे उर्मिला ठेवली

जीव तुटला तुटला
झाला आकांत किती रे
क्षणोक्षणी उर्मिलेला
जाळी विरह चिती रे

शब्दही न बोलताच
प्रिया गेलास निघून
कुणाकडे पहायाचे
चौदा वर्षे मी इथून

जाळतात चांदण्याच्या
पूनवा ह्या हृदयाला
रोज अवस दिवस
उठे घास गिळण्याला

तरी  निरोपास तुझ्या
जागते मी मरताना
कर्तव्याची आहुती रे
राख होत उरताना

कधी येशील प्रिया तू
शिणलेले गात्र माझे
सारे देऊनिया रिते
जीवनाचे पात्र माझे

वेदनेला उरी जागा
प्रीत प्रियाचा हा धागा
प्राण तगवू कसा रे
दिला जन्माचा तू त्रागा

दि.०२/१०/२०२५
रात्री १२.३९ वा.

## (६७)
## कुणी जरासे हळवे व्हावे

जगण्यासाठी कुणी ठरावे
कारण तर ते उत्तम
नसेल कोणी तर मग व्हावे
जगती या सर्वोत्तम

कधी कुणाची वाट न पहावी
वाट आपुली रेखावी
नव्या पावलांसवे नव्याने
रीत नवी जोखावी

अशी मोहिनी घालत जावी
निर्जन मी काननी
नवे सूर मग उमटून येतील
माझ्या धुंद गायनी

कुणी असो वा नसो प्रशंसक
मी माझ्यात रमावे
परिमळणाऱ्या काळजात मी
नित्यनेमे गमावे

तरी आसमंती गंध माझे
मोहक ते उरताना
कुणी जरासे हळवे व्हावे
मला हळूच स्मरताना

दि.१७/१०/२०२५
रात्री ०११.५६ वा.



## (६८)
## तू आला की माझी दिवाळी

एक दिवा मी आज लावला
तुझिया आठवणींचा
तेजामागे घडला आपसुक
सोहळा पाठवणीचा

त्या त्या आपुल्या गोड स्मृतींचे
तेज दीप उजळले
किती दिव्यांची आरासही मज
मनी मला ते कळले

कळेल का रे उंबऱ्यात मी
सदाची तेवत आहे
तुझ्या वाटेवर पंचप्राणांची
पणती ठेवत राहे

आठवते का बघ ना तुजला
ती पहिली दिपवाळी
घरात होती मनात आपुल्या
उजळून गेली दिवाळी

ये ये झडकरी तुझ्या पदतळी
जीव दीप लावीयले
तू आला की माझी दिवाळी
दिव्यांस मी दावीयले

दि.१८/१०/२०२५
रात्री ०९.३७ वा.

## (६९)
## हुंदके आले तरी

गहिवर किती किती दाबलेले
निःश्वास किती मी कोंडलेले
आवंढे गटकन जे गिळलेले
एकांती हिशेब सारे मांडलेले

कसे सांगावे कुणा
आत डाचताती किती
शल्ये मनी लपलेले
दडलेल्या किती भीती

हुंदके आले तरी
मुक्या मुक्याने दिले होते जे
आता पुन्हा आठवात येती
परि नवे नवे भासताते जे

ओघळलेल्या आसवांच्या
गालावरती सुकल्या रेषा
खारट दुःखातून बुडवती
दूर लोटती प्रीत प्रदेशा

कंठू कसे जे जीवन म्हणती
रोज रोजचे हे रडगाणे
रुसलेल्या दैवगतीचे
विसाव्याचे मीच ठाणे

दि.०९/११/२०२५
रात्री ११.३४ वा.



## (७०)
## कळले कधीच ना

पाहते अशी कुणा
कळले कधीच ना
चालले कसा मी रस्ता
कळले कधीच ना

वाहिले जीवास मी
कळले कधीच ना
राहिले कशी कुठे
कळले कधीच ना

सरली उमर कींशी
कळले कधीच ना
झिजले किती कशी
कळले कधीच ना

सपान पाहिले का मी
कळले कधीच ना
इतुके साहिले का मी
कळले कधीच ना

जन्म संपला कसा
कळले कधीच ना
जीव खुळावला कसा
कळले कधीच ना

दि.११/ ११/२०२५
रात्री १२.४८ वा

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**
  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)
  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५
  ई-मेल : dr.manjushak@gmail.com
  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा:** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा, सृष्टीगंध, युगंधरा, सुख सुखाचं, पानापानातली कथा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, निरव नमन (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप, श्रीरंग (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री, सहा सोहळे (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), बकुळफुले, अळुमाळु, सुरभी, कामिनी, फुललेलं मौन (फुलांवरील कविता), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता, शब्द तुझ्या नावाचे (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी, मृणालिनी, उडण्या हे आभाळ (स्त्रीजीवन), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, क्षणांचं देण, आयुष्याचं गाव (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, दरवळ तुझे नि माझे (त्याच्यावरील प्रीत कविता), मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी (ललितलेख), बोल बरवे, मनस्विनी, हृदयस्पर्शी (रसिक प्रतिक्रिया - कवीश्वर), प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (अन्य रसिक प्रतिक्रिया), गंधराणी (मिश्र कविता), श्रावणी (पाऊस कविता), उल्का (गझल), तेंव्हा (वेळा), नभ मोजताना (धरती-आकाश), जरा रेंगाळले (वाट), रंगतनु, कृष्णकांत (रंग), कविता माझी, लोभसवाणी (सर्वोत्कृष्ट कविता), कवडसा, मृण्मयी, अबोली, अनावर मना, मल्मली, अक्षरा, अनुरंग, नवी नवेली, मन ओथंबुन गेले, उमलवाट, (मिश्र कविता) मन मनुल्या (मन), सुखाचा किनारा (सुख-दुःख), आनंद गंधपाणी, दूर त्या तिथे (गंध-सुगंध) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(मन) – वेध मनाचा, शब्द पाखरं, मन मोहरून माझे, (पशु–पक्षी – घरटे) स्पंदनरेषा, (नाती–गोती) – थांब जरा तू, (चंद्र आणि लज्जा या भावनांवरील कविता) – घडते नवेच काही. (संस्कृत बाल काव्यसंग्रह) – बालमोदिनी, सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या मराठी पुस्तकाचा संस्कृत अनुवाद – त्रिसहस्रसीवनम्, (संस्कृत अनुवाद) – मनुष्यः.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०

- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=1266533350529198id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : १२३
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ०९
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •